सरकार तर्फे साक्षीदार क्र. १ यांची साक्ष.

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की–

माझे नाव : रत्नमाला जिवन उर्फ राजकुमार गिरी,
वय सुमारे : ४५ वर्षे, व्यवसाय : मजुरी,
राहणार : खापरखेडा, नागपुर.

---------------------

**सरकार तर्फे सर–तपासणी सरकारी वकील श्रीमती नायर मॅडम.**

१. मी खापरखेडा येथे वार्ड क्र.४ येथे राहत होते. माझया सोबत माझा लहान मुलगा लखन वय २३ वर्षे आणि मोठा मुलगा राहुल हे देखील राहत होते. माझया पतीचा मृत्यु झालेला आहे. माझा मुलगा लखन हा हातमजुरीचे काम करीत होता. दि.२९.०५.२०१७ रोजी सायंकाळी ०५:३० वाजता लखन हा माझया घरी हजर होता. आरोपी आकाश हा माझया घरी आला आणि त्याने माझा मुलगा लखनला मोटरसायकलने चिचोली या गावी नेले. त्यानंतर अंदाजे अर्धा तासाने माझा मुलगा लखन हा घरी परत आला. लखनच्या चेह–यावर, डोक्यावर व खांदयावर चाकुने मारल्यामुळे जखमा झालेल्या होत्या. मी लखनला विचारले की काय झाले. त्यावरून त्याने सांगीतले की, आरोपीने त्याला चाकुने मारले. मी लखनला आंघोळ करायला लावली आणि त्याला अर्धी पोळी खायला लावली. मी लखनला आराम कर म्हटले. तेव्हा तेथे दुसरा आरोपी सुरज कावळे आला. सुरजने लखनला म्हटले की, चल चिचोली वरून येवु. त्यामुळे लखन सुरज सोबत चिचोली येथे आमच्या मोटरसायकलने गेला. त्यानंतर मी नळावर पाणी भरण्यासाठी गेली असता सुरज वाघमारे नावाचा मुलगा आला आणि त्याने मला सांगीतले की, आरोपी आकाश सोनेकर व सुरज यांनी लखनला खुप मारहाण केली असुन रस्त्यावर रक्त सांडलेले आहे. त्यामुळे मी सुरज वाघमारेच्या मोटरसायकलवर बसुन चिचोली या गावी गेले. तेथे माझा मुलगा लखनची मोटरसायकल रस्त्यावर

पडलेली होती आणि तेथे झाडाखाली रक्त सांडलेले होते. मला असे समजले की, काही लोकांनी माझा मुलगा लखनला बाजेवर टाकुन सरकारी दवाखाना चिचोली येथे उपचारासाठी नेले. त्यामुळे मी दवाखान्यात गेले. पोलीसांनी लखनला चिचोली येथील दवाखान्यातुन बॅडेज लावुन मेयो रूग्णालयात व नंतर शासकीय मेडीकल कॉलेज, नागपुर येथे नेले. त्यावेळी लखन हा बेशुध्द होता. मी पोलीस स्टेशन खापरखेडा येथे फिर्याद दिली. मला आता फिर्याद व छापील प्रथम खबर दाखवले. त्यावर माझया सहया असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यांना आता अ.क्र. **नि.क्र.५५ व ५६** देण्यात येते. त्यानंतर पोलीसांनी माझयाकडे चौकशी करून माझा जबाब नोंदविला. लखनला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपुर येथे ९ दिवस उपचारासाठी भरती करण्यात आले. त्याचा मृत्यु दि. ०७.०६.२०१७ रोजी झाला. त्यानंतर पोलीसांनी माझा पुरवणी जबाब नोंदविला.

२. पोलीसांनी माझयाकडुन लखनचे कपडे जप्त केले होते. आरोपी हे लखनकडे नशा करण्यासाठी पैशांची मागणी करत होते. लखनने त्यांना पैसे दिले नाहीत, म्हणुन आरोपींनी लखनला मारहाण करून त्याचा खुन केला. आरोपी आकाश हा न्यायालयात हजर आहे. मी त्याला ओळखतो. जर मला जप्त करण्यात आलेले लखनचे कपडे दाखविले, तर ते मी ओळखु शकते.

**उलट तपासणी आरोपी करीता ॲड. श्री. सी.आर. ठाकुर.**

३. हे म्हणणे खरे आहे की, माझा मुलगा लखन हा सर्वात प्रथम जखमी अवस्थेत घरी परत आला, तेव्हा मी त्याला पोलीस स्टेशनला नेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी आकाशने लखनला माझया घ ारून नेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, लखनने मला असे सांगीतले

नव्हते की, आकाशने त्याला चाकुने मारून दुखापत केली. हे म्हणणे खरे नाही की, माझा मुलगा लखन हा घरी आला, तेव्हा त्याच्या शरीरावर कोणतीही दुखापत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, सुरज वाघमारेने मला असे सांगीतले नाही की, आकाश व सुरजने लखनला मारहाण केली आहे आणि तो जखमी स्थितीत चिचोली येथे पडलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीच्या विरूध्द खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, सुरज कावळेने माझा मुलगा लखनला माझया घरून चिचोली येथे नेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांकडे खोटा जबाब दिला आणि आज खोटी साक्ष देत आहे.

फेरतपासणी काही नाही.

सा.वा.दा.ब.अ.क.केले.

(सा.र.अग्रवाल)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश
नागपूर
दिनांक : १५.११.२०२२

माझे समक्ष,

(सा.र.अग्रवाल)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश
नागपूर